24/25

Nice.

Assignment Semester - 3rd (III)
Winter - 2022

College Name :- Shivneri Mahavidyalaya.
Student Name :- Mitkar Sumitra Vankat.
Subject Name :- P. B. M.
Class Name :- B. Com. secound year.

Principles of Business Management.

Chapater Name :-

1) Definition, Nature & Scope of Management.
2) Develppment of Management Thought & Approach
3) organisation and staffing
4) Motivation and Leadership.

Page No.
Date: / /

प्रश्न 1 ला :- व्यवस्थापनाची व्याख्या लिहा ? व्यवस्थापनाचे तीन स्तर स्पष्ट करा ?

उत्तर :- व्यवस्थापनाची संकल्पना फार जुनी असून, ती व्यापक व सर्वव्यापी आहे. कालानुसार यात अनेक विचार, दृष्टिकोन समाविष्ट होत गेल्यामुळे ती सतत बदलणारी आहे. व्यवस्थापन संकल्पनेचा अर्थ समजून घेण्यासाठी व्यवस्थापनातील विचारवंतांनी विविध दृष्टिकोनातून केलेल्या व्याख्या समजून घेणे आवश्यक आहे.

व्याख्या -

1) एफ. डब्ल्यू. टेलर :- "व्यवस्थापन म्हणजे कोणते काम करावयाचे आहे व ते काम अधिक चांगल्या प्रकारे व कमीत कमी खर्चात कसे होईल ते जाणून घेण्याची कला होय."

2) ऑलिव्हर शेल्डन :- "व्यवस्थापन हे उद्योगामधील एक कार्य असून ते प्रशासनाने निश्चित केलेल्या चौकटीच्या आत पूर्वनिर्धारित धोरणांची अंमलबजावणी करणे आणि विशिष्ट उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी उपयोग करणे या क्रियांशी संबंधित असते."

व्यवसायात घातल्या मालकांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वत्र व्यवस्थापन केले जात असते, पण प्रत्येक ठिकाणी व्यवस्थापनाची भूमिका व कार्य वेगवेगळ्या प्रकारे केले जाते. व्यवस्थापन पध्दतीही वेगवेगळी असते. व व्यवस्थापकाची भूमिकाही वेगवेगळी असते. आजच्या गुंतागुंतीच्या व एकाचवेळी अनेक प्रकारची कार्ये करणाऱ्या व्यवसायाच्या प्रक्रियेत प्रत्येक मनुष्याची कार्य करण्याची मर्यादा ठरलेली असते. त्याचप्रमाणे एकाचवेळी किती व्यक्तींकडून कार्य करवून घेण्याच्या कौशल्याची मर्यादा देखील ठरलेली असते. औद्योगिक क्रांतीनंतर मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरु करणाऱ्या मोठ्या उद्योगांची आणि सार्वजनिक प्रमंडळांची स्थापना झाली आणि मोठ्या प्रमाणात कर्मचारी संख्या तयार झाली. याचा परिणाम म्हणजे व्यवस्थापनात विविध स्तर किंवा पातळ्या तयार झाल्या. अधिकार व जबाबदारी

झाल्या अधिकार व जबाबदारी यांचा विचार करुन या स्तरांची विभागणी तयार झाली. व्यवसायातील व्यवस्थातून हे अधिकार व जबाबदारी यांच्या वाटपानुसार वरुन खाली सरकते प्रत्येक पातळीवर व्यवस्थापनाची कार्ये वेगळी आहेत. सर्वसामान्यपणे व्यवसायात व्यवस्थापन तीन स्तरांवर चालते. खालील आकृतीवरुन त्याची संकल्पना येईल.

उच्च व्यवस्थापन (Top Management)

↓

मध्यम व्यवस्थापन (Middle Management)

↓

कनिष्ठ व्यवस्थापन (Lower Management)

*1) उच्च व्यवस्थापन :- उच्च व्यवस्थापनात उद्योग व्यवसायातील सर्वोच्च शक्ती काम करतात. त्यामुळे व्यवसायातील सर्व विभागांचे आणि क्रियांचे नियोजन करणे, व्यवसायाचे अंतिम धोरण ठरविणे, धोरणांच्या अंमलबजावणीची योजना तयार करणे, व्यवसायातील सर्व क्रिया, प्रक्रिया आणि विभागात समन्वय निर्माण करणे आणि त्यावर प्रभावशाली नियंत्रण ठेवणे यासारखी बौद्धिक किंवा वैचारिक स्वरुपाची कार्ये उच्च व्यवस्थापन करते. उद्योग व्यवसायाला लागणाऱ्या यंत्रसामग्री, साधनसामग्री, मनुष्यबळ व वित्त उपलब्ध करण्याचे विविध मार्ग शोधून काढणे, त्यांच्यात योग्य समन्वय साधणे आणि व्यवसायाच्या विकासाबरोबर व्यवसायातील व्यक्तींचा विकास घडवून आणणाऱ्या योजना यशस्वीपणे राबविणे यासारखी कार्येही उच्च व्यवस्थापन करते. थोडक्यात, व्यवसायाचे सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचे किंवा धोरणे ठरविण्याचे महत्त्वाचे कार्य उच्च व्यवस्थापन करते. उच्च व्यवस्थापनाची रचना सामान्यपणे खालीलप्रमाणे असते.

संचालक मंडळ
↓
व्यवस्थापकीय संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी
↓
मुख्य व्यवस्थापक

उच्च व्यवस्थापनाच्या अगदी वरच्या स्तरावर कंपनीचे संख्येने जास्त असल्याने मालक असणारे भागधारक असतात. भागधारक कंपनीच्या दैनंदिन कामकाजात भाग घेऊ शकत नसल्यामुळे ते आपले प्रतिनिधी संचालक मंडळाच्या स्वरुपात निवडतात. संचालक मंडळ हे भागधारकांच्या वतीने काम करत असल्याने भागधारकांच्या हितांचे रक्षण करणे, त्यांचे भांडवल सुरक्षित ठेवून त्याचा योग्य विनियोग करण्याचे कार्य करते. संचालक मंडळाच्या प्रमुख म्हणून व्यवस्थापकीय संचालक कार्य करत असतो. व्यवस्थापकीय संचालकालाच मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वोच्च निर्देशक इ. नावाने ओळखले जाते. हा अधिकारी संचालक मंडळाला जबाबदार असल्याने कंपनीतील कार्याचे संचालन, व्यवस्थापन व समन्वयाचे कार्य त्याला करावे लागते. संचालक मंडळाने ठरविलेली ध्येयधोरणे, उद्दिष्टे, निर्णय मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत विभाग प्रमुखांकडे पाठविले जातात. यशस्वी व्यवस्थापन करण्यासाठी विविध विभागांसाठी योग्य प्रकारच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, त्यांना अधिकार प्रदान करुन जबाबदाऱ्यांचे वाटप करणे, व्यवसायाला योग्य अशी संघटना तयार करणे, प्रत्येक विभागाच्या योजनांना आणि व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक बाबींना मान्यता देण्याचे कार्य हा अधिकारी करतो. उच्च व्यवस्थापनात ह्या अधिकाऱ्यांच्या बरोबरीने कंपनी चिटणीस आणि चार्टर्ड अकौंटंटदेखील कार्यरत असतात. साधनसामग्रीचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी मुख्य

Page No.
Date: / /

* 2) मध्यम व्यवस्थापन :- उच्च व्यवस्थापनाने ठरविलेली ध्येयधोरणे व घेतलेली निर्णय अंमलात आणण्याची जबाबदारी मध्यम व्यवस्थापनावर असते. औद्योगिक क्रांतीनंतर व्यवसायाचा आकार वाढल्यामुळे व्यवस्थापनाची कार्ये व व्यवसाय सुरळीत चालावा या उददेशाने व्यवसायात कार्यानुसार विविध विभाग निर्माण करण्यात आले. या विभागांचे विभागप्रमुख व उपविभागप्रमुख यांचा प्रामुख्याने या पातळीवर समावेश होतो. उच्च व्यवस्थापनाने ठरवून दिलेली धोरणे राबविण्यासाठी कर्मचाऱ्यांना सूचना देणे, त्यांच्या कार्याचे स्वरुप ठरविणे, कार्याचे मूल्यमापन करणे इत्यादी कार्ये मध्यम व्यवस्थापन करते. आपल्या विभागाचे नियोजन करणे, उच्च व्यवस्थापनाच्या धोरणांचे विश्लेषण करणे, त्यानुसार आपल्या विभागाचे संघटन करणे, विभागाचे कार्य पूर्ण करण्यासाठी योग्य त्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, त्यांना त्या त्या कार्याची जबाबदारी व अधिकार सोपविणे, कार्यविषयीच्या सूचनांचे एकत्रीकरण करून त्या संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविणे व त्यांना मार्गदर्शन करणे, कार्यपूर्तीसाठी कर्मचाऱ्यांना प्रेरणा देणे, त्यांना प्रोत्साहन देणे, विविध विभागात समन्वय साधणे, आपल्या विभागाच्या अहवाल तयार करणे, आणि तो उच्च व्यवस्थापनाला सादर करणे इ. कार्ये करावी लागतात. मध्यम व्यवस्थापनाची रचना सर्वसामान्यपणे खालील प्रमाणे असते.

विभाग प्रमुख
↓
उपविभाग प्रमुख
↓
कर्मचारी

मध्यम व्यवस्थापनात प्रत्येक विभागाचा